नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १२/१२/२०२५ (शुक्रवार )**

---

# गुन्हे तपासासाठी विकसित करण्यात आलेले MahaCrimeOS AI Copilot चे मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य आणि मायक्रोसॉफ्टचे सीईओ यांनी लोकार्पण केले

दिनांक १२/१२/२०२५ रोजी गुन्हे तपासासाठी विकसित करण्यात आलेले कृत्रिम बुध्दीमत्ता तंत्रज्ञान MahaCrimeOS AI Copilot याचे माननीय मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडवणीस आणि मायक्रोसॉफ्टचे सीईओ श्री. सत्या नडेला यांनी मुंबईत जिओ वर्ल्ड कन्व्हेन्शन सेंटर येथे औपचारिक लोकार्पण केले.

MARVEL – Maharashtra Advanced Research and Vigilance for Enhanced Law Enforcement आणि मायक्रोसॉफ्ट यांच्या संयुक्त विद्यमाने MahaCrimeOS AI Copilot हे गुन्हे तपासासाठी विकसित करण्यात आले असून मार्च २०२५ पासुन नागपूर ग्रामीण पोलीस दलात गुन्हे तपासांसाठी प्रथमच याचा वापर सुरू करण्यात आला. सदर लोकार्पण सोहळयात मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक नागपुर ग्रामीण यांनी मा. मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडवणीस आणि श्री. सत्या नडेला यांना MahaCrimeOS बाबत सविस्तर माहीती दिली. तसेच MahaCrimeOS हे अत्याधुनिक AI Copilot असुन ते सायबर अर्थिक फसवणुक , डिजीटल फसवणुक, डिजीटल अटक, इन्व्हेस्टमेंट फसवणुक तसेच इतर गुन्हे तपासात तात्काळ मदत करते त्यामुळे अर्थिक फसवणुकीमधील रक्कम परत मिळविण्यास तसेच आरोपी अटक करण्यास मदत होते. MahaCrimeOS मध्ये प्रत्यक्ष तपास करणारे सहा. पोलीस निरीक्षक श्री आशिषसिंह ठाकुर

आणि पोलीस नाईक ब.नं. १६३६ श्रीमती संगिता गांवडे यांनी MahaCrimeOS AI Copilot चा गुन्हे तपासात वापर याबाबत सविस्तर माहीती दिली आणि त्याबाबत प्रात्यक्षित सुध्दा करून दाखविले. सदर AI Copilot चा तपासात वापर केल्याने तपासाची गती आणि दर्जा कशा प्रकारे वाढला याबाबत सुध्दा सविस्तर माहीती देण्यात आली.

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात आणि देखरेखीखाली आतापर्यंत नागपूर ग्रामीण पोलीस दलात MahaCrimeOS बाबत १२७ अधिकाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात आले असून, त्यांनी २६० हून अधिक प्रकरणांच्या तपासात याचा यशस्वी वापर केला आहे. श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या सह इतर तपास अधिकारी हे याचा प्रभावीपणे वापर करीत असुन या AI तंत्रज्ञानाच्या प्रभावी उपयोगामुळे नागपूर ग्रामीण पोलीस दल राज्यातील एकमेव घटक ठरले ज्याने माननीय मुख्यमंत्रींच्या १०० दिवसांच्या कार्यक्रमातील पोलीस गटातील सर्व तीन श्रेणींमध्ये पुरस्कार मिळवले. यात जिल्हा पोलिस अधीक्षक, उपविभागीय पोलिस अधिकारी, सावनेर आणि उमरेड पोलिस स्टेशन यांचा समावेश आहे. MahaCrimeOS AI Copilot हे गुन्हे तपास प्रक्रियेला वेगवान, अचूक आणि डेटा—आधारित बनवते, ज्यामुळे पोलीस अधिकाऱ्यांना जटिल प्रकरणे सोडवण्यात मदत होते. सदर लोकार्पण सोहळयात मा. मुख्यमंत्री यांनी मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक नागपुर ग्रामीण आणि नागपुर ग्रामीण पोलीसांचे अभिनंदन तसेच कौतुक केले.


Government of Maharashtra creates
MARVEL to fight crime with AI.
Maha
CrimeOS AI
Investigation copilot
Microsoft






## स्टुडंट – पोलीस कॅडेट उपक्रमाअंतर्गत नगपुर ग्रामीण जिल्हयातील शाळांना भरोसा सेल पथक यांनी भेट देवुन विदयार्थ्यांना केले मार्गदर्शन

केंद्र शासनातर्फे राबविण्यात येत असलेल्या स्टुडंट – पोलीस कॅडेट उपक्रमाअंतर्गत भरोसा सेल, नागपुर ग्रामीण यांनी नागपुर ग्रामीण जिल्हयातील विविध शाळांना भेट देवुन तेथील विदयार्थ्यांना विविध मुद्दयांवर मार्गदर्शन करून जनजागृती केली.

दिनांक ०९/१२/२०२५ रोजी नगर परिषद हायस्कुल व कनिष्ठ महाविदयालय, काटोल आणि जिल्हा परिषद माध्यमिक मुलांची शाळा, काटोल ,दिनांक १०/१२/२०२५ रोजी नगर परिषद माध्यमिक व उच्च माध्यमिक विदयालय,कळमेश्वर आणि नगर परिषद हायस्कुल सावनेर, तसेच दिनांक ११/१२/२०२५ नगर परिषद राजेंद्र हायस्कुल, खापा आणि रामजी महाजन देशमुख, नगरपरिषद विदयालय, रामटेक येथे भेटी देण्यात आल्या. सदर उपक्रमाअंतर्गत सहा. पोलीस निरीक्षक श्रीमती माधुरी गायकवाड, प्रभारी अधिकारी, भरोसा सेल, नागपुर ग्रामीण आणि

त्यांचे पथक यांनी शाळेमधील विद्यार्थ्यांना वाहतूक विभागाचे कार्य, वाहतूक नियमांची माहिती, रस्त्याने उजव्या साईडने चालणे, हेल्मेट चे फायदे, नायलॉन मांजा मुळे होणारे नुकसान, परिस्थितीप्रमाणे घ्यावयाची सतर्कता, अंमली पदार्थांच्या सेवनाने दुष्परिणाम , सायबर गुन्हे तसेच सोशल मीडियाचा गैरवापर आणि दुष्परिणाम , गुड टच /बॅड टच इत्यादींची सविस्तर माहिती देण्यात आली. तसेच विदयार्थ्यांसोबत संवाद साधुन त्यांच्या अडीअडचणी जाणुन घेतल्या आणि त्यांच्या समस्यांचे निराकरण करण्यात आले त्यासोबतच शौक्षणिक वर्ष २०२३ – २०२४ आणि २०२४ – २०२५ या वर्षात ज्या विदयार्थ्यांनी स्टुडंट – पोलीस कॅडेट उपक्रम यशस्वीरित्या पुर्ण केला त्यांना नागपुर ग्रामीण जिल्हा पोलीसांतर्फे प्रशस्तीपत्र देवुन गौरविण्यात आले. **याव्यतिरीक्त अडचणी काळात मदतीसाठी लागणारे हेल्प लाईन क्रं ११२, १००, १०९८ (चाईल्ड हेल्प लाईन क्रमांक), १९३०, १९४५ (सायबर क्राईम हेल्प लाईन क्रमांक) या बाबत सविस्तर माहीती देण्यात आली.**




जिल्हा परिषद
मुलांची शाळा
भारत सरकार
स्टुडंट पोलीस कॅडेट
vivo X90 | ZEISS
Dec 9, 2025, 16:45


" विद्या परम दैवतम "
नगर परिषद हायस्कूल सावनेर
जि. नागपूर

## अवघ्या २ तासात बेपत्ता अल्पवयीन मुलीचा घेतला शोध बुटट्रीबोरी पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन बुट्टीबोरी :—** पोलीस स्टेशन बुट्टीबोरी येथे दिनांक १०/१२/२०२४ रोजी बुट्टीबोरी येथील एक अल्पवयीन मुलगी बेपत्ता असल्याच्या तक्रारीवरून कलम ३१७(३),१४३ भा.न्या.सं अन्वये गुन्हा दाखल आहे. सदर प्रकरणाचे गांर्भिय लक्षात घेता मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री. अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात बुट्टीबोरी पोलीसांनी सदर अल्पवयीन मुलीचा गुप्त बातमीदार आणि तांत्रिक पुराव्याच्या मदतीने अवघ्या २ तासात शोध घेवुन रेल्वे स्टेशन नागपुर येथुन तिला ताब्यात घेतले. नमुद मुलगी ही रागाच्या भरात घरातुन निघुन गेल्याची माहीती पोलसांना प्राप्त झाली. सदर मुलीला तिचे पालकांच्या ताब्यात देण्यात आले असुन पालकांनी बुट्टीबोरी पोलीसांचे आभार व्यक्त केले.

## अवैधरित्या विनापरवाना दारू काढणारे, दारू बाळगुण विक्री करणारे तसेच सेवन करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध ३ गुन्हे नोंद

दिनांक ११/१२/२०२५ रोजी दारूबंदी कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशनला पोलीसांनी अवैधरित्या दारू बाळगुन विक्री करणाऱ्यांवर छापा टाकुन देशी दारू, मोहाफुल दारू असा एकुण २८२०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.

पोलीस स्टेशन उमरेड येथे एकुण १ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन मौदा येथे एकुण १ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन रामटेक येथे एकुण ०१ गुन्हा नोंद आहे. महाराष्ट्र दारू बंदी अधिनियम अन्वये एकुण ३ गुन्हे नोंद केले आहे.

**सदर कारवाईत ३०६० मिली देशी दारु, १२ लीटर मोहाफुल दारू असा एकुण २८२०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. नाशवंत मुद्देमाल पंचनामा कारवाई करून नष्ट करण्यात आला आहे.**

मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने